जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २५८ | शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




## संक्षिप्त

### खरातनंतर आणखी एका भोंदूबाबाचा प्रताप उघड

**नाशिक, ता. १६ :** एकीकडे नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण गाजत असताना दुसरीकडे मुंबईतील मालाडमध्ये भोंदूबाबाच्या प्रतापांमुळे स्थानिक हैराण झालेत. मालाडमध्ये राहणारा हा भोंदू बाबा आपल्या अंगात रविवार आणि गुरुवार या दोन दिवशी देवी येते आणि मी अनेकांच्या शरीरातील भूत उतरवतो असं म्हणत जादूटोणा करत असल्याचा आरोप स्थानिकांनी केलाय. मालाड पूर्वे ला राहणारा रिदम पांचाळ हा व्यक्ती रविवार आणि गुरुवार लोकांची सेवा करतो असं म्हणत जादूटोणा करत असल्याचा आरोप त्याच्या आजूबाजूला राहणाऱ्या स्थानिकांनी केला आहे. मागील दोन वर्षांपासून दर आठवड्याच्या रविवारी आणि गुरुवारी अघोरी पूजा करतो आणि त्याला अंगात देवी आल्याचे म्हणत इतरांच्या अंगातील भूत उतरवतो असं सांगतो. आतापर्यंत त्याच्या घरी, घराच्या समोर अशा प्रकारच्या पूजा किंवा अशा प्रकारचे प्रताप तो करत होता. मात्र ४ एप्रिलला त्याने महापालिकेच्या गार्डनमध्ये शेकडो लोकांना बोलून आपली पूजा करत उघडपणे भूत उतरण्याच्या नावाखाली जादूटोण्याचा प्रकार केल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यापूर्वी नसरापूरमध्ये अवैध धंद्यांचा लपंडाव उघड

## दौऱ्याच्या दिवशीच हातगाडे, अवैध पार्किंग व दारू विक्रीची ठिकाणे गायब

## प्रशासनाच्या डोळेझाकीवर नागरिकांचा सवाल

**विशाल शिंदे**

नसरापूर, ता. १६ : नवसह्याद्री महाविद्यालय परिसरात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नियोजित दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर परिसरात विशेष तयारी करण्यात आली असून, हेलिकॉप्टर उतरण्यासाठी महाविद्यालय येथे हेलिपॅडची सुविधाही तयार करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील अवैध धंद्यांचा अक्षरशः लपंडाव सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे.

विशेष म्हणजे, परिसरातील अवैध वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे, तसेच अनेक दिवसांपासून सुरू असलेले हातगाडे व पुलाखाली चालणारे अनधिकृत व्यवहार आज थांबलेले दिसले. चेलाडी पूल तसेच





टोलनाक्यापर्यंतच्या पुलाखाली मोठ्या प्रमाणात लागणाऱ्या अवैध हातगाड्याही आज गायब झाल्या होत्या.

याचबरोबर चेलाडीच्या पुलाखाली नेहमीप्रमाणे अनेक अवैध वाहने उभी करून पार्किंग केली जात होती. या वाहनांमुळे येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना मोठा अडथळा निर्माण होत होता व वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत होती. मात्र आजच्या दिवशी ही सर्व वाहने पुलाखाली दिसून आली नाहीत. त्यामुळे प्रशासन नेमकेकोणत्या प्रकारे डोळेझाक करत आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

यासोबतच महामार्ग पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्रीचे धंदेही सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. या बेकायदेशीर प्रकारांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री दौऱ्याच्या निमित्ताने जर या भागाचा प्रत्यक्ष आढावा घेतला, तर चेलाडी, कापूरहोळ तसेच केळवडे परिसरात महामार्गालगत साचलेला कचरा व अस्वच्छतेचे गंभीर चित्रही समोर येईल. प्रत्येक थांब्यावर घाणीचे साम्राज्य पसरले असून त्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, एखादा मंत्री किंवा वरिष्ठ अधिकारी येणार असल्यावरच तात्पुरती साफसफाई केली जाते, अन्यथा रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग तसेच पडून राहतात. यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. स्थानिकांमध्ये अशीही चर्चा आहे की, पुलाखाली सुरू असलेले अवैध धंदे हे कोणाच्या तरी वरदहस्तामुळेच सुरू आहेत का? संबंधित ठेकेदार किंवा अन्य घटकांच्या संगनमतातून हे प्रकार सुरू आहेत का, याची सखोल चौकशी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

दरम्यान, नागरिकांकडून प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून अवैध धंदे, वाहतूक अडथळे व अस्वच्छतेच्या प्रश्नावर कायम स्वरूपी तोडगा काढावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात येत आहे.

> ‘नसरापूर परिसरात अवैध धंद्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही मुख्यमंत्री यांना पत्र देऊन या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती करणार आहोत. या धंद्यांना कोणाचे संरक्षण आहे, याची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे.
>
> - **प्रज्योत कदम,** सामाजिक कार्यकर्ते, नसरापूर, (ता. भोर)

# पीएम सूर्य घर योजनेत सौर पॅनेलसाठी मिळणार अनुदान

**मुंबई, ता. १६ :** वाढत्या वीज वापरामुळे घरगुती वीजबिलांचा खर्च सतत वाढत आहे. विशेषतः उन्हाळ्यात एसी, कूलर आणि इतर उपकरणांचा वापर वाढल्याने नागरिकांना जास्त बिलाचा सामना करावा लागतो. या समस्येवर उपाय म्हणून केंद्र सरकारने पीएम सूर्य घर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून घरच्या घरी वीज तयार करून खर्चात बचत करण्याचा पर्याय नागरिकांना उपलब्ध झाला आहे.



ही योजना नागरिकांना सौर ऊर्जेचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. घरांच्या छतावर सौर पॅनेल बसवण्यासाठी सरकारकडून आर्थिक मदत दिली जाते. एकदा सौर पॅनेल बसवले की अनेक वर्षे कमी खर्चात वीज वापरता येते. त्यामुळे वीजबिलाचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो.

या योजनेअंतर्गत सौर पॅनेलच्या क्षमतेनुसार अनुदान दिले जाते. १ किलोवॅट क्षमतेसाठी सुमारे ३०००० रुपये, २ किलोवॅटसाठी सुमारे ६०००० रुपये आणि ३ किलोवॅट किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८००० रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. ही रक्कम थेट अर्जदाराच्या बँक खात्यात जमा केली जाते, त्यामुळे सुरुवातीचा खर्च कमी होतो.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय किमान २१ वर्षे असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराच्या नावावर वीज जोडणी असावी आणि स्वतःचे छत उपलब्ध असणे गरजेचे आहे. चांगला सिबिल स्कोअर असणेही आवश्यक मानले जाते. अर्ज करताना आधार कार्ड, मोबाईल नंबर, वीज बिल आणि सौर पुरवठादाराचे कोटेशन ही कागदपत्रे आवश्यक असतात. दरम्यान, सौर पॅनेल सूर्यप्रकाशातून वीज निर्माण करतात. दिवसा तयार झालेली वीज घरात वापरली जाते आणि उरलेली वीज ग्रीडमध्ये पाठवली जाते. त्यामुळे २४ तास वीज उपलब्ध राहते आणि वीजबिलात बचत होते. या योजनेमुळे नागरिकांना आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# ललित प्रभाकर साकारणार नामदेव ढसाळांची भूमिका

**मुंबई, ता. १६ :** दलित पँथरचे प्रणेते आणि विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित बहुप्रतीक्षित ढसाळ या चरित्रपटाची अखेर अधिकृत घोषणा करण्यात आली असून, त्याचे भव्य पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधत मुंबईत हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या चित्रपटात अभिनेता ललित प्रभाकर नामदेव ढसाळ यांच्या भूमिकेत झळकणार असून, नुकत्याच समोर आलेल्या पोस्टरमधून त्यांचा दमदार आणि प्रभावी लूक प्रेक्षकांच्या चर्चेचा विषय ठरला आहे. ललितचा हा बंडखोर आणि तडफदार अंदाज चित्रपटासाठी मोठं आकर्षण मानलं जातय. संजय पांडेय आणि दि बायोस्कोप फिल्म्स प्रस्तुत, वरुणा मदनलाल राणा निर्मित ढसाळ हा चित्रपट येत्या १ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन वरुणा राणा यांनी केले असून, संवाद प्रताप गंगावणे यांनी लिहिले आहेत.

# बारामतीत करुणा मुंडे यांना भाजपची फुस; रोहित पवार यांचा आरोप

**बारामती, ता. १६ :** बारामतीच्या पोटनिवणुकीत अपक्ष म्हणून मैदानात असणाऱ्या करुणा मुंडे यांना रोखणे भाजपच्या हातात होते. पण त्यांनी तसे प्रयत्नच केले नाहीत. कारण करुणा मुंडे यांना भाजपची अप्रत्यक्ष फुस आहे, असा आरोप राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केला.



बारामती पोटनिवडणुकीत सध्या २३ अपक्ष उमेदवारांचे अर्ज राहिलेत. हे अर्ज राहायला नको होते. अजित पवार यांच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करून जो उमेदवारांचा आकडा ६० होता तो २३वर आणला. अपक्ष उमेदवारांची नावे पाहिली तर त्यात करुणा मुंडे यांचे एक नाव आहे. त्यांना भाजपच्या एखाद्या मोठ्या नेत्याने सांगितले असते तर त्यांनी आपला अर्ज ठेवला नसता. पण तसे प्रयत्न केले नाहीत, असे रोहित पवार म्हणाले.

ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी पवार साहेबांपासून अनेकांनी प्रयत्न केले. मोठ्या पक्षांनी उमेदवार दिला नाही. पण अपक्ष उमेदवार आहेत त्यांनी उभे राहायला नको होते, आपल्या गावातून एकसुद्धा मत अपक्ष उमेदवारांना होणार नाही याचा प्रयत्न आपण सर्वांनी करावा. सर्व ९९ टक्के मतदान सुनेत्रा पवारांना होईल यासाठी प्रयत्न करा. जे बाहेरून आलेत त्यांना एकसुद्धा मत मिळाले नाही पाहिजे, असे रोहित पवार म्हणाले.

काकी सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. काटेवाडी गावातून घोंगडी बैठकीच्या माध्यमातून त्यांनी प्रचाराचा शुभारंभ केला आहे. या वेळी त्यांच्यासोबत वडील राजेंद्र पवार, बहीण सई पवारदेखील उपस्थित होते.

# पुण्यात घरगुती सिलिंडरचा काळाबाजार उघडकीस; आरोपींना केली अटक

**पुणे, ता. १६ :** गॅस सिलिंडरच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिक आधीच हैराण असताना, दुसरीकडे घरगुती गॅस चोरून त्याची चढ्या दराने विक्री करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पुणे पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. हडपसरमधील काळेपडळ परिसरात पोलिसांनी ही कारवाई केली आहे.



आरोपीने काही गरजू आणि अशिक्षित लोकांच्या नावावर गॅस कनेक्शन मिळवले होते. मात्र, या ग्राहकांना त्यांचे गॅस कार्ड कधीच मिळाले नाही; ते कार्ड होळकरने स्वतःकडेच ठेवले. जेव्हा या कार्डवर घरगुती सिलिंडर (९५० रुपये दर) डिलिव्हर व्हायचे, तेव्हा तो त्यातील गॅस काढून छोट्या व्यावसायिक टाक्यांमध्ये भरत असे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार नितीन होळकर याने अत्यंत शिताफीने हे काम केले होते.

घरगुती वापरासाठीचे हे सिलिंडर तो हॉटेल चालक आणि खाद्यपदार्थ स्टॉलधारकांना तब्बल ३ हजार रुपयांना विकत होता. म्हणजेच, घरगुती सिलिंडर तिप्पट नफ्याने विकून तो सर्वसामान्यांच्या हक्काच्या गॅसवर डल्ला मारत होता.

पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे आणि वरिष्ठ निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काळेपडळ पोलिसांनी हा सापळा रचून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

# लोणी काळभोरमध्ये उतारावर ट्रेलरचे सापट तुटले; वाहतूक पोलिसांमुळे प्रवाशांचे प्राण वाचले

**लोणी काळभोर, ता. १६ :** पुणे-सोलापूर महामार्गावर अवजड ट्रेलर चालकाच्या निष्काळजीपणामुळे भीषण अपघाताचा धोका निर्माण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील एमआयटी चौक परिसरात सोमवारी (ता.१३) सकाळी साडे अकरा ते बारा यादरम्यान घडली आहे. सुदैवाने हडपसर व लोणी काळभोर वाहतूक विभागाच्या सतर्क पोलिसांमुळे मोठा अनर्थ टळला आहे. तर संबंधित चालक व सुपरवायझरविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




चालक कैलास सौवरू यादव (वय १६, रा. आजमगड, उत्तर प्रदेश) व सुपरवायझर बाळासाहेब महादेव पालवे (वय ४३, रा. लोणीकंद, पुणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी हडपसर वाहतूक विभागातील पोलीस हवालदार आरती गौरव खलचे (वय-३५) यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस हवालदार आरती गौरव खलचे या एमआयटी चौक, लोणी काळभोर येथे कर्तव्यावर असताना त्यांना एक अवजड ट्रेलर वाहन संशयास्पद व धोकादायक स्थितीत आढळले. एमएच ४६ सीएल ७३३६ क्रमांकाच्या अशोक लेलँड फ्लॅट ट्रेलरमध्ये मोठ्या प्रमाणात जड स्टील रोल लोड करण्यात आले होते. मात्र, वाहनाची कोणतीही तांत्रिक तपासणी न करता चालकाने ते थेट रस्त्यावर आणले.

एमआयटी कॉलेजसमोरील वळण घेत असताना अचानक वाहनाचे सापट तुटले आणि ट्रेलर उताराच्या दिशेने मागे सरकू लागला. या वेळी ट्रेलरवरील जड स्टील रोल खाली घसरून मोठा अपघात होण्याची भीती निर्माण झाली होती. काही क्षणांसाठी परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. यामुळे एमआयटी चौक ते कॉलेजदरम्यान मोठी वाहतूक कोंडी झाली. विशेष म्हणजे, पुणे शहर हद्दीत अवजड वाहनांना बंदी असताना देखील हा ट्रेलर नियम धाब्यावर बसवून रस्त्यावर आणण्यात आला होता.

पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि संबंधित चालक कैलास यादव व सुपरवायझर बाळासाहेब पालवे यांना ताब्यात घेतले. त्यांच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार आरती खलचे यांच्या फिर्यादीवरून दोघांविरोधात मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११९, १७७ तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम २८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षिप्त

### महामार्गावर नागरिकांना लुटणाऱ्या एका टोळीचा अटक

**पुणे, ता. १५ :** पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आणि महामार्गावर नागरिकांना लुटणाऱ्या एका सराईत टोळीचा मंचर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. कमी किमतीत सोन्याची बिस्किटे देतो, असे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या सहा आरोपींच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत. ही टोळी प्रामुख्याने एकट्या असलेल्या ज्येष्ठ महिला किंवा पुरुषांना आपले लक्ष्य बनवायची. आम्हाला खोदकामात सोन्याची बिस्किटे सापडली आहेत, आम्हाला पैशांची तातडीची गरज आहे, असा बनाव हे गुन्हेगार रचायचे. समोरच्या व्यक्तीला विश्वासात घेण्यासाठी ते सुरुवातीला सोन्याचा एक छोटा तुकडा तपासायला द्यायचे, जो खरा असायचा. मात्र, एकदा का समोरच्या व्यक्तीने मोठी रक्कम किंवा स्वतःचे दागिने दिले, की हे भामटे बनावट सोन्याचे बिस्किटे देऊन पसार व्हायचे. पुणे-नाशिक महामार्गावर कळंब परिसरात गस्त घालत असताना पोलिसांना संशयास्पद हालचाल दिसली. सहाही जणांनी चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. अटक केलेले आरोपी बीड आणि पाथर्डी (अहमदनगर) भागातील असल्याचे समोर आले आहे.पोलिसांनी त्यांच्याकडून सुमारे लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### पर्वती परिसरात गतिमंद महिलेवर अत्याचार

**पुणे, ता. १६ :** पुण्यातून पुन्हा एकदा माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. पर्वती परिसरात एका ३५ वर्षीय गतिमंद महिलेच्या असहायतेचा फायदा घेत तिच्यावर घरातच अत्याचार करण्यात आला असल्याचे समोर आले आहे.मंगळवारी १४ एप्रिल रोजी सायंकाळच्या वेळी ही धक्कादायक घटना घडली. पर्वती पायथ्याशी राहणारी पीडित महिला घरात एकटी असल्याची संधी साधून धीरज लोंढे या नराधमाने तिला गाठले. पीडितेची मानसिक स्थिती ठीक नसल्याचे ओळखून त्याने तिला धमकावले आणि तिच्याच घरात तिच्यावर अत्याचार केला. क्रूरतेची सीमा ओलांडून त्याने पीडितेला जर कोणाला काही सांगितले, तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली आणि तिथून पसार झाला. आरोपी निघून गेल्यावर प्रचंड दहशतीत असलेल्या पीडितेने हिंमत एकवटून घडलेला प्रकार आपल्या वहिनीला सांगितला. वहिनीने वेळ न गमावता पोलिसांकडे धाव घेतली. पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन तपासाची चक्रे फिरवली. सध्या आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

### राज्यात पुन्हा ५ बड्या अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई, ता. १६ :** राज्याच्या प्रशासनात मोठा उलटफेर झाला आहे. गेल्या १५ दिवसांपासून राज्यातील प्रशासनात अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी खड तुकाराम मुंढे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या होत्या. त्यानंतर आता महिनाभरात पुन्हा एकदा ५ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.यात आयएएस रेवैया डोंगरे, आयएएस मंगेश जोशी, आयएएस कुलदीप जंगम, आयएएस कुशल जैन, आयएएस डॉ. बी. एन. पाटील या बड्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.या सगळ्यांची विविध शहर आणि वेगवेगळ्या विभागात बदली करण्यात आलीय.

# वाघोलीतील दोन सराईत गुन्हेगार पुणे जिल्ह्यातून तडीपार

**वाघोली, ता. १६ :** वाघोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत दहशत निर्माण करणाऱ्या आणि वारंवार गुन्हे करणाऱ्या रेकॉर्डवरील दोन आरोपींविरुद्ध पोलिसांनी तडीपारीचे अस्त्र उगारले आहे. परिमंडळ ७ चे पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांनी तडीपारीचे आदेश काढले आहेत.

बिरा रामदास श्रीराम (वय-३८, रा. हांडगर वस्ती, भावडी, ता. हवेली) याला संपूर्ण पुणे जिल्ह्यातून २ वर्षासाठी तर आदित्य बापू शिंदे (वय २४, रा. बीजीएस फाटा, गाडे वस्ती, ता. हवेली) याला पुणे जिल्ह्यातून एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे. १४ व १५ एप्रिल रोजी पोलिसांनी या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिरा श्रीराम व आदित्य शिंदे या दोन्ही आरोपींवर वाघोली आणि लोणीकंद पोलीस ठाण्याच्या



हद्दीत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. बिरा श्रीराम याच्यावर खुनाचा प्रयत्न करणे, घातक शस्त्राने गंभीर दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवून वारंवार शारीरिक दुखापत करणे आणि शांतता भंग करणे असे गुन्हे दाखल आहेत. तर आरोपी आदित्य शिंदे याच्याव्बर बेकायदेशीर अग्नीशस्त्रे बाळगणे, धमकी देणे, शासकीय आदेशाचा भंग करणे आणि शिवीगाळ-दमदाटी करणे यांसारखे गुन्हे दाखल आहेत.

दरम्यान, सदर गुन्हेगारांनी वाघोली परिसरात मोठ्या प्रमाणावर दहशत निर्माण केली होती, ज्यामुळे स्थानिक रहिवासी दडपणाखाली वावरत होते. लोकांच्या जीवितास आणि मालमत्तेस धोका निर्माण झाल्याने, कायद्याचा वचक बसवण्यासाठी पोलीस उप आयुक्त सोमय मुंडे यांनी हा तडीपारीचा आदेश दिला आहे. भविष्यात अशाच प्रकारे संघटित गुन्हेगारी आणि अवैध धंदे करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईची मोहीम सातत्याने राबविली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वाघोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) पल्लवी मेहेर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चंदन, मनोज बागल, सागर कडू, कमलेश शिंदे, राकेश गायकवाड आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

## आंब्याचे आमिष दाखवून अडीच वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार


**पुणे, ता. १६ :** पुण्यातील पिंपरी चिंचवडमध्ये एका ४७ वर्षीय नराधमाने अडीच वर्षाच्या चिमुरडीला आंब्याचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी पीडित मुलीच्या पालकांनी पोलिसांत तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी विजय भोसले नावाच्या नराधमाला अटक केली आहे.

विजय भोसले याने सोमवारी दुपारी त्याच्या शेजारी राहणाऱ्या अडीच वर्षाच्या मुलीला आंबे खाण्यासाठी घरात बोलावले. त्यानंतर त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. मुलीला त्रास होऊ लागल्यानंतर पालकांनी तिला महापालिकेच्या थेरगाव रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर चिमुरडीवर अत्याचार झाल्याचे उघडकीस आले. त्यानंतर चिमुरडीच्या आईने काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

# महाराष्ट्राला आता मिळणार २७ नवीन आमदार; राजकीय हालचालींना वेग

**पुणे, ता. १६ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नुकत्याच पूर्ण झाल्यानंतर आता विधानपरिषदेतील रिक्त जागांवर निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे येत्या ३ महिन्यांत महाराष्ट्राला २७नवे आमदार मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली असून संबंधित प्रक्रियेबाबत माहिती गोळा केली जात आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून द्यायच्या १७ जागा गेल्या ३ वर्षांपासून रिक्त होत्या. काही ठिकाणी आवश्यक मतदारसंख्या उपलब्ध नसल्यामुळे या जागांवर निवडणुका घेता आल्या नव्हत्या. मात्र अलीकडेच नगरपालिका, म



हापालिका तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्यामुळे परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे आता या रिक्त जागांसाठी निवडणूक घेणे शक्य झाले आहे.

दरम्यान, काही जिल्ह्यांमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे अद्याप निवडणुका झालेल्या नाहीत. तरीही ७५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार उपलब्ध असतील तर निवडणूक घेता येते, असा नियम लागू होऊ शकतो. यासाठी निवडणूक आयोगाने संबंधित माहिती मागवली असून लवकरच या १७ जागांसाठी निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे.

याशिवाय, विधानसभेतील सदस्यांमधून निवडून द्यायच्या ९ जागांची मुदत १७ मे रोजी संपत आहे. त्यामुळे या जागांसाठीही निवडणुका होणार आहेत. सध्याच्या राजकीय परिस्थितीनुसार या निवडणुकांमध्ये महायुतीला अधिक जागा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तसेच काँग्रेस नेत्या प्रज्ञा सातव यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे एक जागा रिक्त झाली आहे. या जागेसाठीही पोटनिवडणूक होणार आहे. त्यामुळे एकूण २७ जागांसाठी निवडणूक होण्याची शक्यता आहे.

या सर्व घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात येत्या काही महिन्यांत मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणूक आयोगाच्या हालचालींना वेग आला असून लवकरच निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

## किरकोळ कारणावरून एकाला मारहाण; ५ जणांवर गुन्हा

**अक्षय टेमगिरे**

शिरूर, ता. १५ : शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील फाकटे रोड परिसरात घरात घुसून लोखंडी पाईप अन् लाकडी काठ्या व बेल्टने मारहाण केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार शरीफ उस्मान पिंजारी वय ३३, व्यवसाय गादी विक्री, रा. फाकटे रोड, कवठे येमाई, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या घरी असताना आरोपी सुदाम इचके, शुभम सुदाम इचके, भाऊ इचके, कैलास बच्चे व केतन माटे यांनी अनधिकृतपणे घरात प्रवेश केला.

पाणी मागण्याच्या किरकोळ कारणावरून राग मनात धरून आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून लोखंडी पाईप, लाकडी काठ्या, चामडी बेल्ट तसेच हाताने व लाथाबुक्क्यांनी तक्रारदारास मारहाण केली. यावेळी शिवीगाळ करत जीवे ठार मारण्याची धमकीही दिली या मारहाणीमध्ये तक्रारदार शरीफ पिंजारी यांचा डावा पाय फ्रॅक्चर झाला असून त्यांना गंभीर दुखापत झाली आहे.

सदर प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार उबाळे हे करीत आहेत.

## शिरूरमध्ये बेकायदेशीर दत्तक प्रकरणाचा पर्दाफाश!

### नवजात बालिकेच्या व्यवहारात चौघांवर गुन्हा

**अक्षय टेमगिरे**

शिरूर, ता. १५ : शिरूर येथे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत बेकायदेशीर दत्तक प्रकरण उघडकीस आले असून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरूर पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमांअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत बाल संरक्षण अधिकारी शत्रुघ्न रूस्तूम खोकले (वय ३१, रा. आळंदी, पुणे) यांच्या फिर्यादीवरून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ५ जानेवारी २०२३ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत दुय्यम निबंधक कार्यालय, शिरूर येथे दत्तक प्रक्रियेचे अधिकृत नियम न पाळता नवजात बालिका प्रिशा हिला दत्तक देण्यात आल्याचे निष्पन्न




झाले आहे. या प्रकरणात बालिकेचे पालक सोमनाथ अर्जुन पोटावळे व यशोदा सोमनाथ पोटावळे (रा. तर्डोबाची वाडी, ता. शिरूर) यांनी संबंधित कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता बालाजी अणासाहेब जाधव व सुलभा बालाजी जाधव (रा. मांजरी बुद्रुक, पुणे) यांना दत्तक दिल्याचा आरोप आहे.

बाल न्याय अधिनियमातील नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक झेंडगे मॅडम करत आहेत.

## कोरेगाव पार्क परिसरातील पबमध्ये तरुणीचा विनयभंग!

**पुणे, ता. १६ :** पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील एका हायप्रोफाइल पबमध्ये तरुणीचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित आरोपीसोबतच पब व्यवस्थापकाविरुद्धही गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला पळून जाण्यास मदत केल्याचा आरोप व्यवस्थापकावर करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २४ वर्षीय तरुणी ११ एप्रिल रोजी कोरेगाव पार्क येथील डार्क हॉर्स पब येथे गेली होती. रात्री सुमारे २ ते २.१५ च्या दरम्यान ती वॉशरूमबाहेर उभी असताना एका अनोळखी व्यक्तीने तिच्याशी गैरवर्तन केले आणि अयोग्य प्रकारे



स्पर्श केला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे ती घाबरली आणि तिने मोठ्याने आरडाओरडा केला.

तरुणीच्या आरडाओरडामुळे पबमध्ये गोंधळ उडाला. मात्र, या वेळी मदत करण्याऐवजी पबच्या व्यवस्थापकाने आरोपीला तिथून पळून जाण्यास मदत केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विनयभंग करणाऱ्या व्यक्तीसोबतच व्यवस्थापकाविरोधातही गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेची माहिती मिळताच संगीता अल्फान्सो-शिंदेयांनीतातडीनेघटनास्थळी भेट देत पाहणी केली. कोरेगाव पार्क पोलिस सध्या पबमधील सीसीटीव्ही फुटेज तपासत असून आरोपीचा शोध सुरू आहे. पुण्यातील पब संस्कृतीवर आधीपासूनच चर्चा सुरू असताना या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरात रात्रीच्या वेळी सुरक्षिततेबाबत अधिक कडक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## पुणे प्राईम न्यूजच्या माजी उपसंपादक ज्योती कदम यांचे निधन

**पुणे, ता. १६ :** पुण्यातील पत्रकारिता क्षेत्रासाठी धक्कादायक बातमी समोर आली आहे. तरुण, उत्साही आणि कर्तव्यनिष्ठ पत्रकार ज्योती कदम यांचे अकाली निधन झाले आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण कदम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून पुणे पत्रकारिता वर्तुळात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

ज्योती कदम यांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासात अनेक नामांकित संस्थांमध्ये काम करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांनी प्राईम न्यूज, लेटेस्टली मराठी आणि महाराष्ट्र जागरण यांसारख्या माध्यमांमध्ये काम करत आपल्या लेखणीचा ठसा उमटवला. विशेष म्हणजे पुणे प्राईम न्यूज सोबतच्या त्यांच्या कामामुळे त्यांनी सहकाऱ्यांमध्ये विश्वास आणि जिव्हाळ्याचे



नाते निर्माण केले होते. सध्या त्या महाराष्ट्र जागरणमध्ये उपसंपादक म्हणून कार्यरत होत्या.

मंगळवारपर्यंत त्या नेहमीप्रमाणे कार्यालयात येऊन आपले काम करत होत्या. मात्र बुधवारी त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर सर्वांनाच मोठा धक्का बसला. एका दिवसापूर्वी एकत्र काम केलेली सहकारी अचानक कायमची दूर गेल्याने कार्यालयातील वातावरण शोकाकुल झाले आहे.

ज्योती कदम या अत्यंत मेहनती, प्रामाणिक आणि सकारात्मक विचारांच्या पत्रकार होत्या. कमी वेळात त्यांनी वाचकांमध्ये आणि सहकाऱ्यांमध्ये आपली खास ओळख निर्माण केली होती. त्यांच्या जाण्याने एक आश्वासक करिअर अकाली संपुष्टात आले आहे.

त्यांच्या निधनानंतर सोशल मीडियावरून सहकारी, मित्रपरिवार आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेकांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. पुणे प्राईम न्यूज परिवाराकडूनही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

ज्योती, तुमची उणीव कायम जाणवत राहील. तुमचे हसरे व्यक्तिमत्व, कामाप्रती असलेली निष्ठा आणि सकारात्मक ऊर्जा आम्हाला नेहमी प्रेरणा देत राहील. पुणे प्राईम न्यूज परिवाराकडून तुम्हाला भावपूर्ण श्रद्धांजली.

## अडीच वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला अटक

**पिंपरी चिंचवड, ता. १५ :** पिंपरी चिंचवड शहरात माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. काळेवाडी परिसरातील एकतानगर भागात अवघ्या अडीच वर्षांच्या चिमुरडीवर एका ४७ वर्षीय व्यक्तीने लैंगिक अत्याचार




केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी काळेवाडी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत विजय भोसले नावाच्या संशयित आरोपीला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली. आरोपीने संबंधित लहान मुलीला आंबा खायला देण्याचे आमिष दाखवले आणि तिला स्वतःच्या खोलीत बोलावले. तिथे त्याने या चिमुरडीवर अत्याचार केले. मंगळवारी सकाळी जेव्हा या मुलीला शारीरिक त्रास होऊ लागला, तेव्हा तिच्या पालकांनी तिला तातडीने महापालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रुग्णालयातील डॉक्टरांनी मुलीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला.

पीडित मुलीच्या आईने तिला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, मुलीने घडलेला प्रकार सांगितला. आरोपीने घरात बोलावून आपल्यासोबत गैरकृत्य केल्याचे तिने सांगितले. घटनेची भीषणता लक्षात घेऊन रुग्णालय प्रशासनाने तातडीने पोलिसांना याबद्दल माहिती दिली. माहिती मिळताच काळेवाडी पोलिसांनी वेगाने हालचाली केल्या. पोलिसांचे एक पथक रुग्णालयात दाखल झाले, तर दुसऱ्या पथकाने आरोपीच्या घरावर छापा टाकून त्याला ताब्यात घेतले.

या प्रकरणी पीडित मुलीच्या २८ वर्षीय आईने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. भरवस्तीत आणि दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण काळेवाडी आणि एकतानगर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेमुळे लहान मुलांच्या, विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर स्वरूपात समोर आला आहे. नागरिक या नराधमाला कठोर शिक्षा करण्याची मागणी करत असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. पालकांनी आपल्या लहान मुलांकडे अधिक लक्ष देण्याची गरजही या निमित्ताने व्यक्त होत आहे.

# हवेलीत ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाची २२ लाखांची फसवणूक; एकावर गुन्हा दाखल

**लोणीकंद, ता. १५ :** ट्रान्सपोर्ट व्यवसायासाठी घेतलेल्या गाड्यांचे बँक हप्ते भरण्याच्या अटीवर गाड्या ताब्यात घेऊन, त्या मालकाच्या संमतीविना परस्पर विकून २२ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी डोंगरगाव (ता. हवेली) येथील एकावर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेश उर्फ उत्तम उर्फ बापू मुरलीधर गायकवाड (रा. माळवाडी, डोंगरगाव, ता. हवेली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी पांडुरंग भाऊसाहेब पायगुडे (वय-५०, रा. वाडेबोल्हाई, ता. हवेली)



यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पांडुरंग पायगुडे यांचा २००१ पासून ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. त्यांच्या मालकीच्या टाटा १६१३ मॉडेलच्या चार गाड्या आहेत. मार्च २०२२ च्या सुमारास गाड्यांना पुरेसा धंदा मिळत नसल्याने, ओळखीचे सुरेश गायकवाड यांनी या गाड्या धंद्यासाठी मागितल्या. पायगुडे यांनी गाड्यांचे फायनान्स कंपनीचे मासिक हप्ते गाडीचे लोन संपेपर्यंत भरावेत, या अटीवर तीन गाड्या गायकवाडच्या ताब्यात दिल्या.

यामध्ये MH १२ HD ९८०९ (चोलामंडलम फायनान्स - किंमत ११ लाख), MH १२ KP ७९७४ (मन्नपुरम फायनान्स - किंमत ६ लाख) व MH १२ VT ९८०९ (HDFC बँक - किंमत ५ लाख), या तीन गाड्या दिल्या होत्या. मे २०२३ पर्यंत गायकवाडने धंदा चांगला सुरू असल्याचे आणि हप्ते भरत असल्याचे सांगून पायगुडे यांचा विश्वास संपादन केला. मात्र, जून २०२३ मध्ये गाड्या गायकवाडच्या ताब्यात दिसून आल्या नाहीत. पायगुडे यांनी विचारणा केली असता त्याने गाड्या धंद्यासाठी बाहेर गेल्याचे खोटे कारण सांगितले.

संशय आल्याने पायगुडे यांनी डोंगरगाव परिसरात चौकशी केली असता, गायकवाडने या तिन्ही गाड्या त्यांच्या संमतीविना परस्पर कोणाला तरी विकल्याचे समजले. गाड्या परस्पर विकल्याचे उघड झाल्यावर सुरेश गायकवाडने घरगुती अडचणीमुळे गाड्या विकल्या, मी तुमचे पैसे देतो, असे आश्वासन देऊन तक्रार न करण्यास विनंती केली. मात्र, अनेक महिने उलटूनही गाड्या किंवा त्याचे पैसे न मिळाल्याने पायगुडे यांनी अखेर पोलीस ठाण्यात धाव घेतली.

दरम्यान, सुरेश गायकवाड याने संगनमताने पायगुडे यांचा विश्वासघात करून २२ लाख रुपयांचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास लोणीकंद पोलीस करत आहेत.

# बिबवेवाडीत सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या




**पुणे, ता. १६ :** पुण्यातील बिबवेवाडी परिसरात कौटुंबिक छळाला कंटाळून एका विवाहितेने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाणे यांनी सासरा आणि दीराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मृत महिलेचे नाव काजल सुखदेव काळे (वय २८) असे असून त्या बिबवेवाडी मार्केटयार्ड रोड परिसरात राहत होत्या. याबाबत त्यांच्या बहिणीने पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी हनमंत काळे आणि रतन हनमंत काळे यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे. ११ एप्रिल रोजी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कात्रज येथील वंडर सिटी परिसरात काही कुटुंबे फुटपाथवर तंबू टाकून राहतात. त्या ठिकाणी काजल काळे यांचे पती सुखदेव हे लिंबू-मिरची विक्रीसाठी बाहेर गेले होते. त्यावेळी लाकूड फोडण्याच्या कारणावरून काजल यांचे सासरे आणि दीर यांच्याशी वाद झाला.

या वादात दोघांनी काजल यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप आहे. सतत होणाऱ्या छळामुळे त्रस्त झालेल्या काजल यांनी संतापाच्या भरात जवळील बाटलीतील पेट्रोल अंगावर ओतून घेतले आणि स्वतःला आग लावली. गंभीर अवस्थेत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा तपास गणेश मोहिते करत असून पुढील चौकशी सुरू आहे.

# उरुळी कांचन येथे कालव्याचा दरवाजा तोडून पाण्याची चोरी; अज्ञातावर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. १६ :** मुठा कालव्याच्या दरवाजाचे कुलूप तोडून बेकायदेशीरपणे पाणी सोडल्याची घटना उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील खेडेकर मळा परिसरात घडली आहे. या प्रकारामुळे सिंचन विभागाच्या पाणी वितरण व्यवस्थेत मोठी अनियमितता निर्माण झाली असून, शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मंगळवारी (ता. १४) दुपारी दोन ते बुधवारी (ता. १५) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास अजिंठा लॉंड्री शेजारी असलेल्या जुना मुठा कालवा वितरिका क्र. ५० (किमी ६०/२००) येथे हा प्रकार घडला आहे. याप्रकरणी गिरीषकुमार महादेव जाधव (वय ३९, व्यवसाय-नोकरी रा. हडपसर इस्टन एलिगन्स सोसायटी फ्लॅट नं ४०९, ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन हद्दीतील खेडेकर मळा आणि अजिंठा लॉंड्री शेजारी असलेल्या जुना मुठा कालवा वितरिका क्र. ५० (किमी ६० /२००) येथील दरवाजाला प्रशासनाने कुलूप लावले होते. मात्र, १४ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपासून ते १५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान, कोणा अज्ञात इसमाने या दरवाजाचे कुलूप तोडले. त्यानंतर दरवाजा वर उचलून बेकायदेशीरपणे पाणी सोडल्याने पाणी वितरण व्यवस्थेचा बोजवारा उडाला.

याप्रकरणी पाटबंधारे विभागाचे अधिकारी गिरीषकुमार जाधव यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास उरुळी कांचन पोलीस करीत आहेत.

# फुरसुंगी येथे केटरिंग तरुणाची आत्महत्या; दोन भावांवर गुन्हा दाखल

**फुरसुंगी, ता. १६ :** 'आडनाव' बदलण्यासाठी बहिण भावाच्या जाचाला कंटाळून भेकराईनगर येथील त्रिमूर्ती चौकात राहणाऱ्या एका केटरिंग मॅनेजर तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बहिण भावावर फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रवीण रमेश वाघमारे असे आत्म हत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. तर सोएब शेख (वय २७, व रेश्मा शेख (वय ४०, रा. दांडेकर पुल, स्वारगेट, पुणे.) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या बहिण भावाचे नाव आहे. याप्रकरणी मयत प्रविण वाघमारे याचा भाऊ प्रमोद रमेश वाघमारे (वय २६) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत प्रवीण २०१३ पासून पुण्यात कामाला होता. गेल्या ५ ते ६ वर्षांपासून तो रेश्मा शेख नावाच्या महिलेच्या संपर्कात होता. रेश्मा, तिचा भाऊ सोयेब शेख आणि त्यांच्या साथीदारांनी प्रवीणला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्याच्याकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले. इतकेच नव्हे तर त्याला वारंवार ब्लॅकमेलही केले जात असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

रेश्मा शेख हिने एका नियोजित कटाचा भाग म्हणून प्रवीणचे लग्न आपल्या ओळखीतील तेजल सिंग नावाच्या मुलीशी ९ डिसेंबर २०२५ रोजी जेजुरी येथे लावून दिले. मात्र, लग्नानंतर परिस्थिती अधिक बिकट झाली. रेश्मा शेख आणि सोयेब शेख हे प्रवीणवर 'आमचे आडनाव लाव' असा सतत दबाव टाकत होते. तसेच तेजलची आत्या फरीदा शेख ही देखील त्याला सतत मानसिक त्रास देत होती.

६ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता प्रवीणने आपल्या आईला आणि भावाला या त्रासाबद्दल सांगितले होते. त्यानंतर भाऊ रिक्षा घेऊन कामावर गेला आणि आई घराबाहेर गेली असताना, घरात प्रवीण आणि त्याची पत्नी तेजल होते. सायंकाळी पाऊणे पाचच्या सुमारास तेजल मी माहेरी जाते असे सांगून निघून गेली. आई आणि भाऊ घरी परतल्यावर त्यांना बेडरूमचा दरवाजा आतून बंद आढळला. दरवाजा तोडून आत पाहिले असता प्रवीणने नायलॉनच्या दोरीने सिलिंग फॅनला गळफास घेतल्याचे दिसून आले.

दरम्यान, प्रवीणला तातडीने रुग्णवाहिकेने हडपसर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला उपचारापूर्वीच मयत घोषित केले. प्रवीणला आत्म हत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आणि मानसिक त्रास दिल्याबद्दल दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती माने करीत आहेत.

## नाशिकमधील धर्मांतर प्रकरणात मोठा ट्विस्ट

**नाशिक, ता. १६ :** नाशिकच्या नामांकित कंपनीमधील महिला अत्याचार छळवणूकीतआणि धर्मांतर प्रकरणी मुख्य सूत्रधार असलेली निदा खान मात्र गेल्या २० दिवसांपासून फरार आहे. कंपनीमध्ये मॅनेजर आणि टीम लीडर म्हणून निदा खान काम बघत होती. आरोपींना दररोज कामाचे नियोजन देण्यासाठी होणाऱ्या मीटिंगमध्ये हिंदू मुलींची छळवणूक आणि त्यांच्यावर धर्मांतराचा तगादा लावण्यासाठी निदा खान ऑपरेशन डिपार्टमेंट म्हणून या सर्व गोष्टी घडवून आणत असल्याची धक्कादायक माहिती पोलीस तपासामध्ये समोर आलीय. कंपनीतील तरुणींना आणि महिलांना मानसिक छळवणूक आणि लैंगिक अत्याचार होताना धर्मांतर करण्याचा मुख्य उद्देश ठेवून अनेक कारनामे या निदा खानच्या सांगण्यावरून घडत होत्या अशी माहिती पोलिसांना मिळाली आहे.

# ई-शिवाई बस चालकामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात

**पुणे, ता. १६ :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सुरक्षित प्रवासाच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना समोर आली आहे. कोल्हापूर ते पुणे दरम्यान धावणाऱ्या ई-शिवाई बसमध्ये चालकाच्या वागणुकीमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आल्याचा प्रकार घडला. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून एसटी प्रशासनावर टीका होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ही बस कोल्हापूरहून पुण्याकडे येत होती. प्रवासादरम्यान चालक बस अतिशय वेगात आणि धोकादायक पद्धतीने चालवत होता. वारंवार अचानक ब्रेक लावणे, बस वळवताना नियंत्रण न ठेवणे आणि सतत हॉर्न वाजवणे यामुळे प्रवासी घाबरले होते. काही प्रवाशांनी चालकाला शांतपणे बस चालवण्याची विनंती केली असता त्याने उलट प्रवाशांशी वाद घालत अयोग्य भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे.

हा वाद वाढत गेला आणि कराडजवळ चालकाने अचानक बस थांबवली. जाब विचारणाऱ्या फाळके नावाच्या प्रवाशाला आणि त्यांच्या पत्नीला मध्यरात्री बसमधून खाली उतरवण्यात आले. निर्जन ठिकाणी अशा प्रकारे दाम्पत्याला उतरवण्यात आल्याने इतर प्रवासी संतप्त झाले. त्यांनी चालकाच्या या वर्तनाचा निषेध करत बस पुढे जाऊ दिली नाही.

प्रवाशांच्या विरोधामुळे अखेर चालकाला त्या दाम्पत्याला पुन्हा बसमध्ये घेण्यास भाग पाडले गेले. त्यानंतर बस पुढील प्रवासासाठी रवाना झाली. या घटनेमुळे एसटीच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, या प्रकरणाची दखल एसटी प्रशासनाने घेतली असून चौकशी सुरू करण्यात आली आहे. संबंधित चालकावर योग्य ती कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. मात्र अशा प्रकारच्या घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी कडक पावले उचलण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# पुणे भाजपच्या आजी–माजी नगरसेविका महापालिकेतच टक्केवारीवरून भिडल्या

**पुणे, ता. १६ :** बाणेर परिसरात महापालिकेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या मागासवर्गीय, आदिवासी विद्यार्थिनी व महिलांसाठीच्या वसतिगृहाच्या कामावरून भारतीय जनता पक्षाच्या आजी-माजी नगरसेविकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. एकमेकींना अपशब्दही वापरण्यात आले. पुणे महापालिकेत दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या प्रकाराची सायंकाळपर्यंत जोरदार चर्चा सुरू होती.

वसतिगृहाच्या रखडलेल्या कामासाठी तीन कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे. त्यामधील टक्केवारीतून ही खडाजंगी झाल्याचे आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. भाजपच्या माजी नगरसेविका राजश्री



काळे आणि विद्यमान नगरसेविका रोहिणी चिमटे यांच्यामध्ये झालेल्या या खडाजंगीचा व्हिडिओही व्हायरल झाला आहे. महापालिकेच्या भवन विभागाच्या कार्यालयाजवळ हा प्रकार घडला. झालेल्या प्रकाराची बाहेर वाच्यता होऊ नये, यासाठी भाजपचे पदाधिकारी प्रयत्नशील होते. मात्र, भांडणाचा व्हिडिओच प्रसारित झाल्याने या प्रकाराचा बोभाटा झालाच.

महापालिकेच्या भवन विभागाच्या वतीने बाणेर येथे मागासवर्गीय, अदिवासी विद्यार्थिनींसाठी निवासी शिक्षण केंद्र उभारले जात आहे. या कामाची सुरुवात होऊन अनेक वर्षे उलटल्यानंतरही काम पूर्ण झालेले नाही. महापालिकेच्या च्या निवडणुकीत भाजपच्या तिकिटावर विजयी झालेल्या माजी नगरसेविका राजश्री काळे यांनी हा प्रकल्प व्हावा, यासाठी प्रयत्न केले होते. प्रकल्प पूर्ण व्हावा, यासाठी काळे प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहेत.

यंदाच्या महापालिका निवडणुकीत भाजपने राजश्री काळे यांना उमेदवारी दिली नाही. औंध-बाणेर प्रभागातून रोहिणी चिमटे उमेदवार होत्या. त्या विजयीही झाल्या. वसतिगृहाचे काम बंद असल्याबाबत बुधवारी काळे भवन रचना विभागात आल्या होत्या. तेथे चिमटे आणि संबधित काम करत असलेले ठेकेदार यांच्यात चर्चा सुरू होती. त्या वेळी या दोन्ही आजी- माजी नगरसेविकांमध्ये वाद झाला.

विद्यमान नगरसेविका चिमटे म्हणाल्या, निवासी वसतिगृहाचे काम माझ्या प्रभागात चालू आहे. या कामासंदर्भात काही सोसायट्यांच्या तक्रारी आहेत. त्याची विचारणा करण्यासाठी भवन रचना विभागात गेले होते. या प्रकल्पाच्या निविदेला स्थायी समितीची मंजुरी मिळाली असून, लवकरच काम पूर्ण केले जाईल, असे विभागाचे प्रमुख बिपीन शिंदे यांनी सांगितले.

माजी नगरसेविका राजश्री काळे म्हणाल्या, या कामाची अंतिम निविदा काढण्यात आली आहे. या कामाच्या टक्केवारीच्या मुद्द्यावरून कामात अडथळा आणला जात आहे. टक्केवारी मिळेपर्यंत काम सुरू करू नका, अशी धमकी ठेकेदाराला दिली जाते. अशा प्रकारे काम रोखणे योग्य नाही. यावरून वाद झाला. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले म्हणाले, झालेला प्रकार चुकीचा आहे. महापालिकेत झालेल्या या प्रकाराबाबत आजी-माजी सदस्यांना समज दिली असून, हा वाद अधिक न वाढविण्याची सूचना केली आहे.

## विनोद कांबळीची तब्येत पुन्हा बिघडली

**मुंबई, ता. १६ :** भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीची तब्येत पुन्हा बिघडली आहे. त्यांच्या मेंदूत रक्ताची गाठी आढळल्या असून ब्रेन स्ट्रोकचा धोका असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. कांबळीच्या जुन्या मित्रांनी आर्थिक मदतीसाठी एका व्हॉट्सअॅप ग्रुप देखील बनवला आहे. या ग्रुपमध्ये सचिन तेंडुलकर देखील आहे.

माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीने दारू पिणे सोडले आहे. परंतु त्याची स्मरणशक्ती कमकुवत झाली आहे. यामुळे सिगारेट ओढण्याचा चुका कांबळी करताना दिसतो. यामुळे त्याला ब्रेन स्ट्रोकचा धोका वाढला आहे. ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात युरिनरी इन्फेक्शनचा उपचार केल्यानंतर ५४ वर्षीय विनोद कांबळी बरा झाला होता. त्यानंतर त्याच्या तब्येतीत सुधारणा झाल्या होत्या होत्या. परंतु काही महिन्यानंतर त्याची तब्येत पुन्हा बिघडलीय.

## प्राईम लाईफ



### उन्हाळ्यातही ठेवा तुमची त्वजा तजेलदार, घरच्या घरी करा हे उपाय

होळी पेटल्यानंतर तापमानात वाढ होते. अशा तापलेल्या वातवरणात लगेच त्वचा कोमेजून जाते. अशावेळी घरच्या घरी जर काही सोप्पे उपाय केले तर उन्हामुळे तुमच्या त्वचेचे रक्षण होईल.

१) चंदनाचा लेप : नैसर्गिक कुलर - उन्हामुळे चेहरा लाल होत असेल किंवा जळजळत असेल, तर चंदन पावडर आणि गुलाब पाणी एकत्र करून लावा. हे त्वचेला थंडावा देते आणि चेहऱ्यावरील रॅशेस कमी करते.

२) मुलतानी माती पॅक : ज्यांची त्वचा तेलकट आहे, त्यांच्यासाठी मुलतानी माती म्हणजे वरदान! मुलतानी मातीत थोडे दही किंवा गुलाब पाणी मिसळून चेहऱ्याला लावा. यामुळे चेहऱ्यावरील जास्तीचे तेल शोषले जाते आणि पिंपल्सचा त्रास थांबतो.

३) कोरफड रात्री झोपण्यापूर्वी फ्रेश कोरफडीचा गर चेहऱ्याला लावा. कोरफड म्हणजे निसर्गाचे सर्वात मोठे मॉइश्चरायझर आहे. यामुळे सनबर्न झालेली त्वचा पुन्हा पूर्ववत होते.

४. टोमॅटो आणि लिंबू : टॅनिंगला करा बाय-बाय, उन्हात फिरल्या मुळे त्वचा काळी पडली (ढपपळपस) असेल, तर टोमॅटोचा रस आणि लिंबाचा रस एकत्र करून चेहऱ्याला लावा. १५ मिनिटांनी चेहरा धुवा. नैसर्गिक ब्लीच म्हणून हे उत्तम काम करते.

५ . काकडीचा थंडावा काकडी किसून तिचा रस चेहऱ्याला लावा किंवा काकडीच्या चकत्या डोळ्यांवर ठेवा. यामुळे डोळ्यांखालील काळी वर्तुळे कमी होतात आणि चेहऱ्याला हायड्रेशन मिळते.

# प्रशासनाच्या जाचक अटींविरोधात पुण्यात टँकर व्यावसायिकांचा संप

**पुणे, ता. १६ :** ऐन उन्हाळ्यात पुणे शहरातील खासगी वॉटर टँकर व्यावसायिकांनी आजपासून अनिश्चित काळासाठी संप पुकारला आहे. या निर्णयामुळे शहरात पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे.

टँकर चालक आणि मालकांनी टँकर माफिया हा आरोप ठामपणे फेटाळून लावत आपण सेवा देणारे आहोत, असा स्पष्ट संदेश दिला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सध्याच्या परिस्थितीत टँकर व्यवसाय तोट्यात चालत असून प्रत्येक ट्रिपमागे फक्त ५०० ते ६०० रुपये नफा उरतो. त्यात नव्या नियमांनुसार प्रत्येक टँकरसोबत हेल्पर ठेवणे बंधनकारक करण्यात



आले असून त्यामुळे प्रति ट्रिप सुमारे १५०० रुपयांचा अतिरिक्त खर्च वाढत आहे. त्यामुळे खिशातून पैसे घालून सेवा देणे परवडत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय आरटीओकडून गेल्या २ महिन्यांपासून टँकर वाहनांचे पासिंग बंद असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. सर्व कागदपत्रे पूर्ण असतानाही वाहनांना परवानगी दिली जात नसल्याचा आरोप करण्यात आला. ट्रॉफिक पोलिसांकडून टँकर जप्त करण्याच्या कारवाईमुळे व्यावसायिकांमध्ये असंतोष वाढला आहे.

पाणीपुरवठ्याच्या मुद्द्यावरही व्यावसायिकांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. पुण्यासाठी १४ टीएमसी पाणी मंजूर असताना प्रत्यक्ष वापर २२ टीएमसीपर्यंत होत असल्याचा दावा करण्यात आला. नव्या सोसायट्यांमध्ये शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था नसल्याने नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

कोविड काळातही अखंड सेवा दिल्याची आठवण करून देत प्रत्येक अपघातासाठी चालकांनाच जबाबदार धरले जाते, यावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान, या संपामुळे शहरातील अनेक भागांत पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता असून प्रशासन आणि टँकर संघटना यांच्यात लवकर तोडगा निघतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कवठे यमाई येथे महिलेच्या घरात घुसून विनयभंग

**अक्षय टेमगिरे**

शिरूर, ता. १५ : शिरूर तालुक्यातील कवठे यमाई येथे एका विवाहित महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रा. कवठे यमई, ता. शिरूर, जि. पुणे यांनी फिर्याद दिली आहे. दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास त्या त्यांच्या घरी एकट्या असताना आरोपी शरीफ उस्मान पिंजारी (रा. कवठे यमाई) हा दारूच्या नशेत घरात घुसला.

यावेळी आरोपीने महिलेचा हात पकडून धमकी देत तू कोणाला काही सांगितले तर तुला व तुझ्या मुलीला बघून घेईन असे म्हणत तिची




ओढणी ओढली. तसेच अश्लील भाषेत शिवीगाळ करत तिच्या अंगाला हात लावून विनयभंग केला. झटापटीदरम्यान महिलेचे कानातील टॉप्सही पडून हरवले आहेत.

महिलेने आरडाओरडा केल्यानंतर तिचे नातेवाईक घटनास्थळी धावून आले. त्यांना पाहताच आरोपी बजाज डिस्कव्हर एमएच १४ डीएस ११३७ या दुचाकीवरून घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शिरूर पोलीस करत आहेत.



# महिलेला काठीने मारहाण प्रकरणी दोघांवर गुन्हा

**सासवड, ता. १६ :** तू आमचे वाटोळे केले आहेस, असे म्हणत एका महिलेला डोक्यात काठीने मारून करून जखमी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एका महिलेसह दोघांवर सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यत आला आहे. वीर (ता. पुरंदर) हद्दीतील इंदिरानगर परिसरात मंगळवारी (ता. १४) रात्री ८ ते बुधवारी (ता. १५) सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला.

लिला दिनेश सावंत (वय ४५, धंदा मजुरी, रा. इंदिरानगर वीर ता. पुरंदर) असे मारहाण झालेल्या महिकेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ताराबाई जालिंदर माळवे, व जालिंदर रघुनाथ माळवे, (दोघेही रा. इंदिरानगर, वीर, ता. पुरंदर) यांच्यावर उरुळी कांचन पोल्सी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लीला सावंत या मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आपल्या घरी चुलीजवळ बसल्या होत्या. यावेळी त्यांच्या शेजारी राहणारी ताराबाई माळवे या फिर्यादीच्या घरासमोर आल्या. तू आमचे वाटोळे केले आहेस, असे म्हणत अश्लील शिवीगाळ आणि दमदाटी करण्यास सुरुवात केली.


वाद वाढत गेल्यानंतर आरोपी ताराबाई हिने आपल्या हातातील लाकडी काठीने लीला यांच्या डोक्यात उजव्या बाजूला जोराने प्रहार केला. यामध्ये लीला सावंत या जखमी झाल्या. यावेळी लीला यांची बहीण सुनीता महेश शिंदे ही भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करायला आली असता, आरोपींनी तिलाही हाताने मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली.

दरम्यान, याप्रकरणी सासवड पोलिसांनी सावंत यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ताराबाई माळवे, व जालिंदर माळवे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार जाधव करीत आहेत.

# हरवलेली बॅग शोधून पोलिसांकडून मूळ मालकाला परत

**पुणे, ता. १६ :** चंदननगर परिसरात पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. आयटीसी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर निशांत कुमार यांची अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे असलेली लॅपटॉप बॅग बुधवारी (ता. १५ ) हरवली होती. मात्र, अवघ्या दोन तासांत पोलिसांनी शिताफीने शोध घेत ही बॅग सुरक्षितपणे परत केली.

चंदननगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलेश बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जगदाळे, पोलीस हवालदार रमेश मेमाणे व पोलीस अंमलदार सुशील बेंद्रे यांनी तात्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. अत्यंत जलद हालचाली आणि शिताफीने शोधमोहीम राबवत त्यांनी अवघ्या दोन तासांत बॅगचा मागोवा



घेत ती सुरक्षितपणे हस्तगत केली.

दरम्यान, या हरवलेल्या या बॅगमध्ये पल कंपनीचे मॅकबुक, लॅपटॉप, स्वतःसह संपूर्ण कुटुंबाचे पासपोर्ट, बँकेचे क्रेडिट व डेबिट कार्ड्स तसेच इतर महत्त्वाची कागदपत्रे होती. त्यामुळे ही घटना अत्यंत महत्वाची मानली जात होती.

पोलिसांच्या या तत्पर आणि कार्यक्षम कामगिरीमुळे मोठा अनर्थ टळला. बॅग परत मिळाल्यानंतर निशांत कुमार यांनी पोलिसांचे म नापासून आभार मानत त्यांच्या काम ाचे कौतुक केले. या घटनेमुळे पुणे पोलिसांची कार्यक्षमता आणि सजगता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून नागरिकांमध्येही सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे.

# लोणी काळभोर येथे टेम्पोचा अपघात; वाहतूक पोलिसांच्या तत्परतेने कोंडी सुटली

**लोणी काळभोर, ता. १६ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील एसटी बस स्थानकासमोर रिकामे ड्रम घेऊन सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या या टेम्पोवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. गुरुवारी (ता. १६) सकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पो चालक सोलापूर बाजूकडे जात असताना अचानक त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि टेम्पो महामार्गाच्या मध्यभागी पलटी झाला. टेम्पोमध्ये रिकामे ड्रम असल्याने ते रस्त्यावर विखुरले गेले. या अपघातात टेम्पोचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, मात्र चालक थोडक्यात बचावला असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



अपघात वर्दळीच्या वेळी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास झाल्याने महामार्गावर दोन्ही बाजूंनी मोठी वाहतूक कोंडी झाली होती. वाहने महामार्गाच्या मध्यभागी आडवे असल्याने सोलापूरकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

या अपघाताची माहिती मिळताच हडपसर वाहतूक शाखेचे ज्ञानोबा बडे, चेतन सुलाखे, सचिन कांबळे, पोलीस हवालदार साळुंखे आणि मदने यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. टेम्पो जड असल्याने तो बाजूला करणे कठीण जात होते, अखेर क्रेन पाचारण करण्यात आली. क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त टेम्पो बाजूला काढल्यानंतर आणि रस्त्यावर विखुरलेले ड्रम हटवल्यानंतर वाहतूक हळूहळू पूर्वपदावर आली.

दरम्यान, स्थानिक नागरिक आणि वाहतूक पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे काही वेळातच ही कोंडी फोडण्यात यश आले. मात्र, सकाळच्या सत्रात झालेल्या या अपघातामुळे प्रवाशांचे चांगलेच हाल झाले.

# अमेरिका–इराण युद्ध थांबणार? ‘होर्मुझची सामुद्रधुनी’ होणार खुली?

**तेहरान, ता. १६ :** गेल्या अनेक महिन्यांपासून युद्धज्वाळांमध्ये होरपळणाऱ्या मध्यपूर्वेतून आता एक आनंदाची बातमी समोर येत आहे. इस्त्रायल, लेबनॉन आणि इराण यांच्यातील संघर्ष आता निर्णायक वळणावर असून, लवकरच युद्धविरामाची घोषणा होण्याची शक्यता आहे. डोनाल्ड ट्रम्प यांची एक सोशल मीडिया पोस्ट आणि पाकिस्तानची सक्रिय मध्यस्थी यामुळे जागतिक राजकारणात मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. इस्त्रायली मंत्रिमंडळाने लेबनॉन मधील संभाव्य युद्धविरामावर सविस्तर चर्चा केली आहे. इराण-समर्थित हिजबुल्लाहसोबत सुरू असलेला रक्तपात थांबवण्यासाठी इस्त्रायल आता गंभीर असल्याचे दिसत आहे. लवकरच अधिकृत घोषणा होण्याचे संकेत दिले आहेत.



या संपूर्ण संघर्षात पाकिस्तान एक महत्त्वाचा ‘मध्यस्थ’ म्हणून समोर आला आहे. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असिम मुनीर सध्या तेहरानमध्ये असून ते इराण आणि अमेरिका यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. व्हाईट हाऊसनेही या चर्चेचे वर्णन फलदायी असे केले आहे. जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली ‘होर्मुझची सामुद्रधुनी’ पुन्हा पूर्ण क्षमतेने सुरू व्हावी, यासाठी ट्रम्प प्रशासन आग्रही आहे.

मध्यपूर्वेतील युद्ध थांबल्यास त्याचा थेट परिणाम भारतासह संपूर्ण जगावर होईल. कच्च्या तेलाचे दर कमी झाल्यामुळे पेट्रोल-डिझेल स्वस्त होऊ शकते. तसेच, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा व्यापार सुरक्षित झाल्यामुळे जागतिक पुरवठा साखळीपुन्हा पूर्ववत होईल.

आगामी शनिवार-रविवार पाकिस्तानमध्ये होणाऱ्या अमेरिका-इराण चर्चेकडे आता संपूर्ण जगाचे डोळे लागले आहेत. जर ही चर्चा यशस्वी झाली, तर सुरु असलेला संघर्ष थांबणार आहे.

## संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात

**नवी दिल्ली, ता. १६ :** महिला आरक्षण लागू करण्यासाठी आजपासून संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. आजपासून पुढील २ दिवस हे विशेष अधिवेशन होणार आहे, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीतच महिला आरक्षण कायदा लागू करण्याच्या उद्देशाने आणलेल्या या विधेयकाचे अधिकृत नाव नारी शक्ती वंदन अधिनियम असे आहे. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्यासाठी हे विशेष अधिवेशन बोलवण्यात आलंय. यासाठी घटना दुरुस्ती करण्यात येणार असून, लोकसभेत सध्या ५४३ खासदार आहेत. ही संख्या ८५० पर्यंत वाढणार आहे. यात संविधान (१३१ वा दुरुस्ती) विधेयकाद्वारे अनुच्छेद ८१ मध्ये बदल करण्यात येणार आहे. तसेच लोकसंख्येची नवी व्याख्या निश्चित केली जाणार असून, संसदेद्वारे मान्य केलेल्या जनगणनेनुसारच प्रतिनिधित्व निश्चित होईल.

# जमीन खरेदीपूर्वी खात्यात तीन कोटी रुपयांची उलाढाल

### खरातप्रकरणी नाशिकच्या दाम्पत्यासह शेवगावच्या चौघांची चौकशी

**शिर्डी, ता. १६ :** शिर्डीत चार एकर जमिनीच्या व्यवहारापूर्वी भोंदू अशोक खरातच्या नाशिकमधील दोन बँक खात्यांत अहिल्यानगर आणि नाशिकच्या सहाजणांनी ३ कोटींपेक्षा अधिक रक्कम आरटीजीएसने टाकल्याचे समोर आले आहे. धक्कादायक म्हणजे यात शेवगावच्या चौघांचा समावेश आहे.

भोंदू खरात, त्याची पत्नी कल्पनाची नाशिक आणि सिन्नर येथील बँक ऑफ बडोदा आणि युनियन बँक या दोन राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये खाती आहेत. त्यात मागील दोन वर्षांत २१ कोटींपेक्षा अधिक व्यवहार झाले आहेत. शिर्डीतील रावसाहेब गोंदकर यांच्या चार एकर जमिनीची पाच कोटींना खरेदी करण्यात आली होती. अशोक खरातने गोंदकर यांना ही रक्कम वेगवेगळ्या तारखांना वर्ग



केली होती. मात्र, रावसाहेब गोंदकर याने फसवणूक झाल्याची फिर्याद दिल्यानंतर शिर्डी पोलिसांनी अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात यासह अरविंद बावके, किरण सोनवणे आणि अशोक तांबे यांच्याविरोधात सावकारकी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

भोंदू अशोक खरात प्रकरणात दीपक लोंढे यांची शिर्डी पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे. अशोक खरातसोबत असलेल्या आर्थिक व जमीन व्यवहारांमध्ये दीपक लोंढे यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध असल्याचा संशय व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, मंत्री दीपक केसरकर यांचे निकटवर्तीय म्हणून लोंढे यांचे नाव समोर येत असल्याने राजकीय वर्तुळातही मोठी खळबळ माजली आहे.

## युद्धामुळं जगात गरिबांची संख्या वाढणार

**नवी दिल्ली, ता. १६ :** जगात कुठेही युद्ध झालं तरी त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होत असतात. रशिया-युक्रेन युद्धावेळी जगावर आर्थिक संकट कोसळलं होतं.त्यातच सुरू झालेलं आखाती युद्ध आता भारतासाठी धोक्याची घंटा ठरणार आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम म्हणजेच यूएनडीपीच्या अहवालानं अनेक देशाची झोप उडवलीय. युद्धामुळे इराणमध्ये ५० लाखाहून अधिक लोक गरिबीत ढकलले जातील. त्यानंतर भारतात २४ लाख ६४ हजार ६९८ लोकं गरिबीच्या खाईत लोटले जातील. त्याशिवाय चीनमध्ये ६ लाख २२ हजार ७३५ तर पाकिस्तानात ४ लाख २१ हजार ९६४ दारिद्र्य रेषेखाली जातील. दरम्यान यूएनडीपीच्या अहवालानुसार, सध्या सुरु असलेल्या युद्धामुळे भारतात ऊर्जा आणि इंधन क्षेत्राशी संबंधित उद्योगांना सर्वाधिक फटका बसेल. ज्यामुळे भाजीपाला अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडतील.